नि.फौ.ख.क्रं. २३०/२०२४
शासन वि. राजेंद्र
नि.क्र. ६४/क

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०४ यांची शपथेवर जबानी</u>**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | सतीश लहानू मदने |
| वय | : | ४२ वर्षे |
| व्यवसाय | : | शेती |
| राहणार | : | शिराळ, ता. आष्टी जि. बीड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एम.दारुनकर यांचेमार्फत</u>**

**१.** दि. ४.१२.२०२३ रोजी जाधव पोलीसांनी सकाळी ८ ते ९ च्या सुमारास शिराळ येथील हनुमंत गाव मदने वस्ती येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. सोबत दुसरे पंच अशोक श्रीराम हे होते. घटनास्थळ फिर्यादीने दाखविले. फिर्यादीने मारहाण झालेले ठिकाण दाखविले. घटनास्थळाच्या पुर्वेला रस्ता, पश्चिमेला आप्पा मदने, पन्नालाल मदने यांची जमीन उत्तरेला आरोपीची जमीन आणि दक्षिणेला पडीक जागा आहे. पोलीसांनी माझ्या समक्ष मारहाण केलेला अंदाजे ५००–७५० ग्रॅम वजनाचा दगड जप्त केला. पंचनामा पाहिल्यास ओळखू शकतो. पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास नि.पी– **६५/पीडब्ल्यु–४** देण्यात येते. दुस–या पंचाची सही मी ओळखतो.

२. साक्षीदारास जी.एम.पी. नंबर ३२/२०२५ वरील मुद्येमाल दाखवण्यात आला. साक्षीदाराने मुद्येमाल दगड तोच असल्याचे ओळखले. एम.ओ. १ देण्यात आला आहे.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एच. शेकडे यांच्यातर्फे उलटतपास शपथेवर सुरु –**

०३. फिर्यादीचे पती बाळासाहेब पुर्वीपासून ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझा बराच काळ इंदोर येथे गेला. माझ्यावर कोणतेही गुन्हे नाहीत. दुसरा पंच श्रीराम यास ओळखतो. हनुमंत गाव माझ्या घरापासून दीड कि.मी. आहे. फिर्यादीचे व आरोपीचे घर पुर्वीपासून मला माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादीच्या घरामध्ये एकच भिंत आहे. त्यांची घरे वेगवेगळी नाहीत. रस्त्यापासून त्यांची घरे १० फुट अंतरावर आहेत. माझे संबंध कोणाशीही चांगले नाही. अमान्य की, स.क्र. ३ बाळासाहेब माझा मित्र आहे. अमान्य की, फिर्यादीच्या घरी

सारखे जाणे येणे असते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेबाबत मला माहित नाही. अमान्य की, पंचनामा झाल्याचे खोटे सांगत आहे. अमान्य की, फिर्यादीच्या पतीला मदत व्हावी म्हणून साक्ष देत आहे. अमान्य की, बाळासाहेबांच्या सांगण्यावरुन साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण- फेरतपास नाही.**

दि.२३.०२.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.02.25 11:03:31 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी